ePaper
विधानसभेपूर्वी धर्मवीर 2, एकनाथ शिंदे यांच्या बंडाची कथा!




॥ वर्ष - 8 । अंक - 16 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com ॥ रविवार, दिनांक 21 जुलै 2024 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

**आतील पानांत**

- नॅशनल क्रशने जिंकली मनं
- ‘भावा, घरी बायका मुलं आहेत जरा बेताने
- ‘पराभवानंतरही अहंकार कसा येतो?
- नीट प्रकरणी: सीबीआयची मोठी कारवाई

## ...तर औद्योगिक क्षेत्रात
# पिंपरी चिंचवड दिशादर्शक ठरेल!

### सर्वांची एकजूट हवी, नक्कीच इतिहास घडवू : शरद पवार

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहराच्या विकासात स्थानिकांचे योगदान फार महत्त्वाचा आहे. स्थानिकांनी जागा दिल्या म्हणूनच आज ही औद्योगिक नगरी नावारूपाला आली. आता ही प्रगती थांबवायची नाही. नवनवीन उद्योगधंदे येथे आणायचे आहेत. मला खात्री आहे की, देशातच नव्हे तर देशाबाहेरही उद्योगाच्या क्षेत्रात पिंपरी चिंचवडचा परिसर एक वेगळी दिशा दिल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी आपल्या सगळ्यांची एकजूट हवी, नक्कीच आपण इतिहास घडवू असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भव्य विजयी संकल्प मेळाव्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पिंपरी चिंचवड शहर जिल्हाच्या वतीने (दि.२०) पिंपरी येथे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.**




यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, खासदार बजरंग सोनावणे, खासदार अमोल कोल्हे, माजी गृह राज्यमंत्री किन्हाळकर, माजी खासदार श्रीनिवास पाटील, आमदार रोहित पवार, युवक अध्यक्ष मेहबूब शेख, विद्यार्थी आघाडीचे प्रदेश अध्यक्ष सुनील गव्हाणे, ज्येष्ठ नेते आझम पानसरे, शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेवक अजित गव्हाणे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, अनेक आजी माजी नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले की, सुरुवातीच्या काळात पिंपरी चिंचवड म्हणजे छोटी छोटी गावे होती. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी टाटा कंपनी शहरात आणली. त्यानंतर बजाज कंपनीही आणली. त्यानंतर खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांती झाली. त्या पाठोपाठ हिंदुस्थान अँटिबायोटिक्स कंपनी स्थापन झाली. आज पिंपरी चिंचवड औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाते. हजारो हातांना काम मिळाले. लोकसंख्या वाढत गेली म्हणून हिंजवडीत आयटी पार्क आणले. आज लाखों तरुणांना रोजगार मिळाला आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात स्थानिकांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. स्थानिकांनी जागा दिल्या, मानसिकता ठेवली म्हणूनच आज ही औद्योगिक नगरी नावारूपाला आली. आता ही प्रगती थांबवायची नाही. नवनवीन उद्योगधंदे येथे आणायचे आहेत. मला खात्री आहे की, देशातच नव्हे तर देशाबाहेरही उद्योगाच्या क्षेत्रात पिंपरी-चिंचवडचा परिसर एक वेगळी दिशा दिल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी आपल्या सगळ्यांची एकजूट हवी, नक्कीच आपण इतिहास घडवू असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला.

## कर्तृत्व वाया जाऊ न देण्याची काळजी घेणार

शरद पवार यांच्याकडून विधानसभा निवडणुकीच्या पायाभरणीला सुरुवात करण्यात आली आहे. त्यातच शरद पवार पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्याच्या दौऱ्यावर होते. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत असलेले मंत्री दिलीप वळसे पाटील यांचा हा बालेकिल्ला मानला जातो. यावेळी शरद पवारांनी वळसे पाटील यांच्या विरोधात देवदत्त निकम यांना रिंगणात उतरवण्याचे संकेत दिले आहेत.

### शरद पवार काय म्हणाले?

माध्यमांशी बोलताना शरद पवार म्हणाले की त्यांनी देवदत्त निकम यांच्या बाबत अद्याप तरी विचार केलेला नाही. मात्र ज्या पद्धतीने एकेकाळी देवदत्त निकम यांनी भीमाशंकर सहकारी साखर कारखाना चालवला. त्यामुळे कर्तृत्ववान माणसाचं कर्तृत्व वाया जाऊ नये, याची विशेष काळजी घ्यायची आहे, असे स्पष्टपणे शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. शरद पवार हे आज आंबेगाव तालुक्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना संकेत दिले आहेत.

### वळसेंची कन्या शरद पवार गटातून?

माध्यमांनी शरद पवारांना विचारले की, दिलीप वळसे पाटील यांच्या कन्या या तुमच्या पक्षाकडून लढणार आहेत. मात्र शरद पवार यांनी याबाबत निर्णय आमचे स्थानिक नेते घेतील. बाहेरच्यांनी उभे राहण्याचा प्रश्नच नाही, असे सांगितले. देवदत्त निकम यांचे बाबत विचार केलेला नाही. मात्र एकेकाळी ज्या पद्धतीने देवदत्त निकम यांनी भीमाशंकर सहकारी साखर कारखाना चालवला, त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. एखाद्या कर्तृत्ववान माणसाचे कर्तृत्व वाया जाऊ न देणे याची आपण विशेष काळजी घ्यायला हवी.

# मी माझ्या पैशाने कपडे खरेदी करतो

## जॅकेटवर प्रश्न विचारताच अजित पवारांनी पत्रकारांना सुनावलं

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागील काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सभा आणि कार्यक्रमांमध्ये गुलाबी रंगाचा वापर प्राध्यान्याने केला जातो आहे. अजित पवारदेखील सातत्याने गुलाबी रंगाचे जॅकेट परिधान करताना दिसून येत आहेत.**



यावरून आता विविध राजकीय चर्चांनाही उधाण आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे या गुलाबी कॅम्पेनवर विरोधकांकडून टीकाही करण्यात आली आहे. दरम्यान, या 'पिंक पॉलिटिक्स'वर आता अजित पवार यांनी भाष्य केलं आहे.अजित पवार यांनी आज पुण्यात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यादरम्यान त्यांना त्यांच्या गुलाबी जॅकेटबाबतही विचारण्यात आलं. मात्र, यासंदर्भात बोलताना त्यांनी थेट माध्यमांच्या प्रतिनिधींनाच सुनावलं. मी माझ्या सद्सदविवेक बुद्धीनुसार कपडे घालतो, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली.मी गुलाबी रंगाचे जॅकेट घातला तर तुम्हाला काही त्रास होतो का? मला व्यक्तिस्वातंत्र्य आहे. मी कोणत्या रंगाचे कपडे घालायचे, ते ठरवण्याचा अधिकार माझा आहे. मी माझ्या पैशाने कपडे खरेदी करतो. जे सर्वसाधारण लोक घालतात, त्याच प्रकारचे कपडे मी घालतो, असं अजित पवार म्हणाले. तसेच माझ्या सदसदविवेक बुद्धीनुसार जे पटतं ते कपडे मी घालतो. मी ऑड डार्क असं काही घालत नाही, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. पुढे बोलताना, तुम्ही कोणत्या रंगाचा शर्ट घातलाय त्यावर मी काही बोललो का? असा प्रश्नही त्यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना विचारला.अजित पवार यापूर्वी अनेकदा गुबाली रंगांचे जॅकेट परिधान करताना दिसून आले आहेत. अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केला त्यावेळीसुद्धा त्यांनी गुलाबी रंगाचे जॅकेट घातलं होतं. तसेच त्यांच्या पक्षाच्या नेत्यांनी सिद्धीविनायकांचे दर्शन घेतलं, तेव्हाही त्यांच्या गळात गुबाली रंगाचे उपरणं दिसून आलं. याशिवाय बारामतीत झालेल्या पक्षाच्या कार्यक्रमादरम्यानदेखील व्यासपीठापासून तर सर्वत्र गुलाबी रंगाचा वापर करण्यात आला होता.

दरम्यान, अजित पवार गटांच्या गुलाबी कॅम्पेनवर विरोधकांकडून टीकाही करण्यात आली. शरद पवार गटाचे नेते अमोल कोल्हे यांनी यावरून अजित पवार यांना लक्ष्य केलं होतं. "अजित पवार गुलाबी रंगाचे जॅकेट घालतात. यामागे राज्याचं वातावरण गुलाबी करण्याचा त्यांचा मानस असू शकतो. पण तसं होईल असं वाटत नाही, जॅकेट घालून राजकारण होत नाही" असा टोला त्यांनी अजित पवार यांना लगावला होता.

### गुलाबी कॅम्पेनवर विरोधकांकडून टीका

यावरून आता विविध राजकीय चर्चांनाही उधाण आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे या गुलाबी कॅम्पेनवर विरोधकांकडून टीकाही करण्यात आली आहे. दरम्यान, या 'पिंक पॉलिटिक्स'वर आता अजित पवार यांनी भाष्य केलं आहे. अजित पवार यांनी आज पुण्यात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यादरम्यान त्यांना त्यांच्या गुलाबी जॅकेटबाबतही विचारण्यात आलं. मात्र, यासंदर्भात बोलताना त्यांनी थेट माध्यमांच्या प्रतिनिधींनाच सुनावलं.

---

# 'लाडक्या बहिणीचा प्रश्न', संतापले आमदार 'दादा'

## सुप्रिया सुळे -आमदार सुनील शेळके यांच्यात खडाजंगी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आज पुणे जिल्हा नियोजन बैठक पार पडली. यात अजित पवार गट आणि शरद पवार गट याच्यात खडाजंगी झाल्याचे पहायला मिळाले. अजित पवारांनी सुप्रिया सुळेंच्या प्रश्नावर टाळाटाळ करत खासदारांना बैठकीत बोलण्याचा अधिकार नसल्याचे सांगितले. यामुळे वातावरण तापले होते.**



यानंतर सुप्रिया सुळे आणि सुनील शेळके यांच्यामध्ये वादाची ठिणगी पडली. सुप्रिया सुळेंच्या प्रश्नावर सुनील शेळके संतापल्याचे चित्र दिसून आले आहे.निधी वाटपावरून पुणे जिल्हा नियोजन बैठकीत सुप्रिया सुळे आणि आमदार सुनील शेळके यांच्यात खडाजंगी झाली आहे. आम्हाला न्याय मिळणार का? का फक्त मावळला निधी मिळणार, असा सवाल सुप्रिया सुळेंनी बैठकीत विचारला. त्यावर सुनील शेळकेंचा संताप झाल्याचे दिसून आले आहे. यावर सुळेंना प्रत्युत्तर देत शेळके म्हणाले, ताई आम्ही बारामती बारामती करत नाहीत, तुम्ही सारखं मावळचा उल्लेख करत आहात, असं ते म्हणाले. यावर पलटवार करत सुप्रिया सुळे म्हणाल्या, आम्ही काय फक्त बैठकीला यायचं का? असा सवाल विचारण्यात आला. यामुळे पवारांसमोरच वातावरण तापल्याचे चित्र निर्माण झालं होतं.

सुप्रिया सुळे आणि सुनील शेळके यांच्यात वाद झाला. हा वाद लक्षात घेत अजित पवार यांनी यात हस्तक्षेप केला. तसेच निधी देण्याबाबत आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा करु असे ते म्हणाले. तसेच चर्चा करुन निधी नक्कीच दिला जाईल, असं आश्वासनही यावेळी अजित पवारांनी दिलं आहे. यानंतर हा वाद थांबल्याचे पहायला मिळाले. तसेच यानंतर दुसऱ्या प्रश्नावर चर्चा सुरू करण्यात आली आहे.

आज पुणे जिल्हा नियोजन बैठक पार पडली. यात अजित पवार गट आणि शरद पवार गट याच्यात खडाजंगी झाल्याचे पहायला मिळाले. अजित पवारांनी सुप्रिया सुळेंच्या प्रश्नावर टाळाटाळ करत खासदारांना बैठकीत बोलण्याचा अधिकार नसल्याचे सांगितले. यामुळे वातावरण तापले होते.

यानंतर सुप्रिया सुळे आणि सुनील शेळके यांच्यामध्ये वादाची ठिणगी पडली. सुप्रिया सुळेंच्या प्रश्नावर सुनील शेळके संतापल्याचे चित्र दिसून आले आहे.

### कोल्हेंनी अजित पवारंना घेरले

पुणे जिल्हा नियोजन बैठकीसाठी शरद पवार आणि अजित पवारांनीही हजेरी लावली होती. यावेळी रविंद्र धंगेकर, सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे हे देखील उपस्थित होते. या बैठकीत पाणी प्रश्नावर सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांनी अजित पवारांना घेरलं होतं. यावेळी अजित पवारांनी प्रश्नाकडे दुर्लक्ष करत तुम्हाला बैठकीत बोलण्याचा अधिकार नाही म्हणत प्रश्नाला उत्तर देणं टाळलं आहे.

# डेंगीच्या रुग्णांची संख्या वाढता वाढे!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे नोंदणी करण्याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील डेंगीचा प्रार्दुभाव दिवसेंदिवस वाढतच आहे. शनिवारपर्यंत (ता. २०) रुग्णसंख्या २७ वर जाऊन पोचली असून, रुग्णांमध्ये १५ पुरुष व १२ महिलांचा समावेश आहे. संशयित रुग्णांची संख्या वाढून, ३ हजार ३०७ वर जाऊन पोचली आहे. एका बाजूला डेंगीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी 'डेंगी मुक्त पिंपरी चिंचवड' ही मोहीम महापालिकेच्यावतीने राबविली जात आहे. मात्र, दुसरीकडे डेंगीच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असल्याचे चित्र आहे. संशयित रुग्णांची संख्या वाढल्याने महापालिका व खासगी दवाखान्यांमध्ये रुग्णांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे.**



डेंगीची लक्षणे दिसल्यास बहुतांश नागरिक डॉक्टरांच्या सल्ल्याने खासगी लॅबमधून डेंगीची चाचणी करून घेतात. मात्र, ही चाचणी सकारात्मक आल्यानंतर संबंधित रुग्णाच्या रक्ताचे नमुने वायसीएम रुग्णालयातील सेंटिनल लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवणे आवश्यक आहे. या ठिकाणी डेंगीची चाचणी सकारात्मक आल्यावरच संशयित रुग्णाला डेंगीची लागण झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, ही चाचणी सकारात्मक आलेल्या रुग्णांची माहिती खासगी लॅबकडून महापालिकेला देणे बंधनकारक आहे. मात्र, बहुतांश नागरिकांना या प्रक्रियेविषयी माहितीच नाही. त्यामुळे एकीकडे डेंगीमुक्त पिंपरी चिंचवड मोहीम सुरु असताना दुसरीकडे डेंगी झाल्यावर काय प्रक्रिया करावी, याबाबतही नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणेही गरजेचे आहे.

> "डेंगीची चाचणी सकारात्मक आलेल्या रुग्णाची माहिती वायसीएम अथवा महापालिका रुग्णालयाला देणे हे खासगी लॅबसाठी बंधनकारक आहे. सेंटिनल लॅबमधील रिपोर्ट सकारात्मक आल्यानंतरच डेंगी झाला, असे समजले जाते व त्या रुग्णाची माहिती ऑनलाइन पद्धतीने सर्व यंत्रणांना दिली जाते. तसेच ज्या ठिकाणी डेंगीचे संशयित रुग्ण आढळून येतात अशा ठिकाणीही लगेचच फवारणी केली जात आहे.'
>
> **– डॉ. लक्ष्मण गोफणे,**
> आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महापालिका

### रुग्ण सापडूनही औषध फवारणी उशिराने

डेंगीची चाचणी सकारात्मक आलेल्या रुग्णांची माहिती मिळाल्यानंतर लगेचच रुग्ण राहत असणाऱ्या परिसरात सर्वेक्षण करणे, औषध फवारणी करणे गरजेचे आहे. मात्र, या रुग्णांची नोंद घेणे, ती वायसीएम व वैद्यकीय विभागाकडे पाठविणे यासाठी महापालिकेची वेगळी यंत्रणा नाही. त्यामुळे डेंगीचे रुग्ण वाढूनही काही भागात फवारणीसाठी आरोग्य पथके पोचलेली नाहीत. औषध फवारणीसाठी देखील नागरिकांना महापालिका व क्षेत्रीय कार्यालयांकडे मागणी करावी लागत आहे. काही सोसायट्यांमध्ये माजी नगरसेवक व स्थानिक नेत्यांकडून औषध फवारणी केली जात आहे. एका बाजूला डेंगीपासून बचावासाठी नागरिकांना एक तास काढण्यास सांगितले जात आहे. मात्र, पावसाळा सुरू झाल्यावर लगेचच फवारणी का केली जात नाही, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

### रावेत परिसरात डेंगीचे रुग्ण

रावेत : वाल्हेकरवाडी परिसरातील भोंडवेनगर येथील एकवीरा कॉलनीमध्ये डेंगीचा रुग्ण आढळल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. परिसरात पालिकेचा सुसज्ज दवाखाना नसल्यामुळे रुग्णाला चिंचवड येथील खासगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागत आहे. पालिकेच्या आरोग्य विभागाकडून परिसरातील विविध सोसायटी, शाळा, महाविद्यालयांमधून डेंगी आणि चिकनगुनिया या आजाराविषयी जनजागृती करण्यात येत आहे. परिसरातून मोठा नाला जात असल्यामुळे या ठिकाणी नेहमी कचऱ्याचे आणि पाण्याचे साम्राज्य असते. त्यामुळे नेहमी दुर्गंधी पसरलेली असते. त्यातच पाणी साचून राहात असल्यामुळे डासांच्या वाढीस पोषक वातावरण मिळते. या नाल्याची आरोग्य विभागाच्या वतीने नियमित स्वच्छता होत नाही. त्याच बरोबर आवश्यक औषध फवारणी वेळेत केली जात नाही, त्यामुळे परिसरात डासांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून परिसरात वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घर व परिसर स्वछ ठेवावा. घरासमोरील गटाराचे पाणी वाहते करण्यात यावे व त्यात कचरा टाकू नये. घराच्या आवारातील तसेच गच्चीवरील पाणी साचून राहणाऱ्या निरोपयोगी वस्तू नष्ट कराव्यात. पाणी साठवलेल्या भांड्यावर सतत झाकण राहील याबाबत काळजी घ्यावी. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा आदी काळजी घेतल्यास डासांपासून होणाऱ्या विविध आजारांवर मात करता येऊ शकते.

---

# मामुर्डी-सांगवडे पुलाची उभारणी तूर्तास 'अधांतरी'

## पाच महिने उलटूनही ठेकेदारांच्या पात्र-अपात्रेबाबत निर्णय नाही

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मामुर्डी आणि सांगवडे परिसरास जोडणारा पवना नदीवरील पुलाच्या निविदा पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याला पाच ठेकेदारांनी प्रतिसाद दिला आहे. मात्र, पाच महिने उलटूनही ठेकेदारांच्या पात्र-अपात्रेबाबत निर्णय होऊ न शकल्याने या पुलाच्या कामाला सुरूवात झाली नसल्याचे चित्र आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेने मामुर्डी येथील स्मशानमूभीजवळ पवना नदीवर सांगवडे गावाला जोडणारा पूल बांधण्याचा निर्णय घेतला आहे. शहराच्या सीमेवर असलेल्या मामुर्डी व किवळे भागातून हिंजवडी आयटी पार्ककडे जाण्यासाठी जवळचा पूल नसल्याने नागरिकांना मोठा वळसा मारून ये-जा करावी लागत आहे. त्यामुळे, वेळ व प्रवास खर्च अधिक होत आहे. त्याठिकाणी सध्या असलेला लोखंडी पूल धोकादायक झाला आहे. ही गैरसोय टाळण्यासाठी नवीन पूल उभारला जाणार आहे.

या कामाची निविदा १४ फेब्रुवारी २०२४ ला प्रसिद्ध करण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या निविदेची प्रक्रिया अडकून पडली होती. या कामासाठी पाच ठेकेदेरांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यातील पात्र आणि अपात्र ठेकेदाराची निवड प्रक्रिया सुरू आहे.

### आयुक्तांच्या मंजुरीनंतर काम सुरु

निवड प्रक्रियेत ठेकेदार पात्र, अपात्र निवड केली जाणार आहे. आयुक्तांसमोर मंजुरीसाठी प्रस्ताव ठेवला जाईल. त्यांच्या मंजुरीनंतर पुलाच्या कामाला सुरूवात होणार आहे. मात्र, पाच महिने उलटूनही पात्र-अपात्र प्रक्रियेअभावी या पुलाच्या कामाला सुरूवात झालेली नाही.

### असा असणार पूल

- महापालिकेच्या नव्या आराखड्यानुसार मुख्य पूल १२ मीटर रूंद, ९० मीटर लांब,
- मामुर्डीकडील १२ मीटरचा जोड रस्ता ३०० मीटर लांबीचा राहणार.
- सांगवडेकडील १२ मीटरचा जोड रस्ता १३० मीटर लांबीचा करण्याचे नियोजन

> मामुर्डी- सांगवडे पुलाच्या निविदेस पाच ठेकेदारांनी प्रतिसाद दिला आहे. त्यातील पात्र आणि अपात्र ठेकेदाराची निवड प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर, तो प्रस्ताव आयुक्तांसमोर ठेवला जाईल. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. **- ज्ञानदेव जुंधारे,** सहशहर अभियंता, स्थापत्य विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

# तस्मै श्री गुरवे नम:




**सातपुते सर काही दिवसांपासून कैलाशचं निरीक्षण करत होते. तो वर्गात पहिल्या बाकावर बसणारा हुशार, चुणचुणीत विद्यार्थी. गणितातील शिकवलेल्या भागावरील कोणताही प्रश्न विचारा, उत्तर देण्यासाठी त्याचा हात नेहमीच सर्वात आधी वर होत असे. त्याची उत्तरे शंभर टक्के बरोबर असत.**

म्हणून सातपुते सर त्याला सविस्तर उत्तर विचारण्याआधी बाकी काही विद्यार्थ्यांना विचारत. कुणालाच योग्य व अचूक उत्तर आले नाही तर शेवटी ते कैलाशला विचारत.कैलाश समोर येऊन टेबलवरील खडू घेऊन फळ्यावर स्टेप बाय स्टेप विचारलेल्या गणिताचे उत्तर सोडवत असे. त्यामुळे अर्थातच त्याचा आत्मविश्वास वाढलेला होता. अभ्यास व ज्ञान माणसाला आत्मविश्वासू बनवते. आधी कमी बोलणारा कैलाश आता बराच बोलका झाला होता. त्याच्या दहावीच्या वर्गातील सर्व विद्यार्थी त्याची वही अभ्यासासाठी नेत व त्याच्याकडून ते गणित कसे सोडवायचे हे पण समजून घेत. काही आळशी विद्यार्थी समजून घेण्याच्या फंदात न पडता त्याच्या वहीतून उत्तरे जशीच्या तशी उतरून घेत व गृहपाठ म्हणून दुसऱ्या दिवशी सरांना दाखवत. त्यामुळे तो सर्वांचाच प्रिय होता. पण अलीकडे तो फळ्याकडे पाहताना मान वर करून, डोळे बारीक करून,



मानेला ताण देत पाहायचा. सातपुते सरांच्या मनात एक शंका आली. त्यांनी कैलाशजवळ येऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवला. त्याने वर मान करून सरांकडे पाहिले. सरांनी त्याच्याकडे पाहून स्मित केले व म्हटले, "मधल्या जेवणाच्या सुट्टीत मला भेट." कैलाशने मान हलवून होकार दिला. त्याला प्रश्न पडला की सरांनी आपल्याला मधल्या सुट्टीत भेटायला का बोलावले असेल. आपण तर नियमितपणे शाळेत येतो, घरचा अभ्यास पूर्ण करतो, शिकवण्याकडे पूर्ण लक्ष देतो, सर्व प्रकारची शिस्त पाळतो. "अरे, ये आत." मधल्या सुट्टीत शिक्षकांच्या खोलीत बसलेल्या सातपुते सरांनी दाराबाहेर उभ्या कैलाशकडे पाहून म्हटले. तेथे सातपुते सर एकटेच होते. बाकी शिक्षक चहा, कॉफी प्यायला शाळेच्या बाजूला असलेल्या चहाच्या टपरीवर गेले होते."बस." सरांनी समोरच्या खुर्चीकडे बोट दाखवत म्हटलं."नाई, उभाच ठीक हाये, सर." तो अंग चोरून म्हणाला."अरे, मी म्हणतो ना बस म्हणून." सरांनी जोर देऊन म्हटल्याबरोबर कैलाश संकोच करत सरांच्या समोरच्या खुर्चीत बसला. "तुला माहीत आहे का मी तुला येथे कशाला बोलावले आहे?" "नाई, सर." कैलाशच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होते. "मी दोन चार दिवसांपासून पाहत आहे, की तू फळ्याकडे पाहताना डोळे किलकिले करतोस. तुला व्यवस्थित दिसत नाही का?""हाव, सर. मले फळ्यावरचं सर्व अस्पष्ट दिसते. माले डोये जयजय करतात अन् फळ्याच्या इकडे एकसारखं पाह्यलं की डोयांतून पानी येते. डोक्सं बी दुखते. घरी बाबाले सांगतलं. बाबा म्हनत की गुरुवारी मजुरीचे पैसे भेटल्यावर डोये तपास्याले तालुक्याच्या डॉक्टरच्या इकडे जाऊ.""मला हीच शंका आली होती. चल माझ्यासोबत." खुर्चीतून उठत सर कैलाशला इशारा करत म्हणाले. "कुठी?" कैलाशनं विचारलं. सरांनी काहीच उत्तर दिलं नाही. बाहेर येऊन त्यांची मोटारसायकल काढली. कैलाश त्यांच्यापाठोपाठ आलाच होता. सरांनी मोटारसायकल सुरू केली व त्याला मागे बसण्याचा इशारा केला. गावापासून दहा किलोमीटर अंतरावर तालुक्याचं ठिकाण होतं. सरांनी तालुक्यातील एका इमारतीसमोर मोटारसायकल थांबवली. कैलाशनं इमारतीवरील बोर्ड वाचला. बोर्डवर लिहिले होते: दोघे आत गेले. सरांनी एका चिठ्ठीवर त्यांचे नाव लिहून रिसेप्शनिस्ट मुलीकडे ती चिठ्ठी दिली व ते दोघेही रिसेप्शन रूम मधील खुर्च्यांवर बसले. ती चिठ्ठी घेऊन ती मुलगी डॉक्टरांच्या केबिनमध्ये गेली व दोनच मिनिटांत तिने बाहेर येऊन दोघांकडे पाहत म्हटलं," तुम्ही आत जाऊ शकता." दोघे केबिनमध्ये गेले."अरे, या, सातपुते सर, बसा. आज अचानक कसं येणं केलं? आता तर शाळेची वेळ असेल तुमची." डॉक्टरांनी सरांचं हसून स्वागत केलं. ते सरांच्या ओळखीचे होते. सरांनी कैलाशकडे हात दाखवत म्हटले, "हा माझा विद्यार्थी. खूप हुशार आहे. काही दिवसांपासून त्याला व्यवस्थित दिसत नाही. डोळे चुरचुरतात. डोळ्यांतून पाणी येते. डोकं पण दुखते."

## प्रासंगिक »

### वर्गवादाचा साप

***भारतीय असूनही 'बाहेरच्यां'नी अमेरिकेत स्थायिक होण्यास त्यांचा विरोध आहे! परंतु हे राजकारण आजचे अजिबात नाही...***

जेम्स व्हान्स या चाळिशीही न ओलांडलेल्या युवा राजकारण्यास आपला सहकारी म्हणजे संभाव्य उपाध्यक्ष ठरवून डोनाल्ड ट्रम्प यांनी विचित्र विरोधाभासाला हात घातला आहे. या व्हान्सची अर्धांगिनी म्हणजे उषा चिलुकुरी या अस्सल भारतीय. येत्या काही महिन्यांनी त्या 'श्रीमती उपाध्यक्ष' होऊ शकतात. पुढील काही वर्षांत कदाचित अमेरिकेच्या प्रथम नारीदेखील! तिकडे जो बायडेन बाबांना कदाचित उपरती झाली आणि त्यांनी अध्यक्षीय लढतीतून माघार घेतली, तर मिश्र भारतवंशीय कमला हॅरिस कदाचित थेट अध्यक्षपदाच्या लढतीत उतरू शकतात... आणि अध्यक्षही बनू शकतात. जेम्स व्हान्स यांना उपाध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यासाठी प्रथम ट्रम्प यांना अध्यक्षपदावर निवडून यावे लागेल. तसे निवडून येण्यासाठी 'आपल्या' मतदारांवर अधिकाधिक जोमाने प्रभाव पाडावा लागेल.

कोणत्याही ज्येष्ठ सरकारी अधिकाऱ्याच्या कार्यालयात गेल्यावर अधिकारी एका भल्या मोठ्या टेबलामागे बसलेले असतात. समोरच्या खुर्च्यांवर लोक लाचारपणे बसून असतात आणि त्याहून अधिक लोक कार्यालयाबाहेर निमूटपणे आपला नंबर येण्याची वाट पाहत असतात. नागरिक एवढे लाचार का झाले आहेत?

# दोन-तीन दशकांत नोकरशाही बेबंद का झाली?

बेबंदशाहीच्या संदर्भात प्रकर्षाने आठवते ती ग्रीक पौराणिक कथांतील एक म्हण – जिचा मतितार्थ असा की, 'देवाला ज्यांचा नाश करायचा असतो त्यांना तो आधी वेड लावतो- त्यांची बुद्धी भ्रष्ट करतो'! लोकमान्य टिळकांनी १०० वर्षांपूर्वी असाच एक प्रश्न विचारला होता, पण तो त्यावेळच्या परकी राजसत्तेच्या संदर्भात होता. आता हा प्रश्न भेडसावतोय की हे वेड सत्ताधाऱ्यांना लागले आहे, की आपणा सर्वांना लागले आहे. कोणी काहीही करेना, त्याचे आपल्याला काही वाटेनासे झाले आहे. सर्वच क्षेत्रांत बेबंदशाही दिसून येत आहे आणि सत्ता किंवा पैशांचा जोरावर ती समाजस्वीकृत करून घेता येऊ लागली आहे. राज्यकर्ते – यात धंदेवाईक राजकारणी व नोकरशाही आले – जनतेला नागरिक न मानता प्रजा समजतात. गेले काही दिवस वर्तमानपत्र गाजवत असलेले पूजनीय व्यक्तिमत्व याच मानसिकतेचे प्रतिनिधित्व करणारे आहे. या संदर्भात



'द इकॉनामिस्ट' नियतकालिकात काही आठवड्यांपूर्वी आलेला एक लेख प्रासंगिक वाटतो. या अहवालाचे शीर्षक आहे, 'मीट द महाराजाज ऑफ द वर्ल्डस बिगेस्ट डेमॉक्रसी', जिचे उपशीर्षक बरेच काही सांगून जाते. आणि ते या आशयाचे आहे की भारतीय नोकरशाही नागरिकांना 'प्रजा' असल्याप्रमाणे वागवते. लेखाच्या सुरुवातीलाच रंगवलेले चित्र सर्वांच्या परिचयाचे आहे – कोणत्याही ज्येष्ठ सरकारी अधिकाऱ्याच्या कार्यालयात गेल्यावर तो (किंवा ती) एका भल्या मोठ्या टेबलामागे बसलेले असतात. समोर रांगेने मांडलेल्या खुर्च्यांवर लोक लाचारपणे बसून असतात आणि त्याहून अधिक लोक कार्यालयाबाहेर निमूटपणे आपला नंबर येण्याची वाट पाहत असतात. अगदी तहसीलदार कार्यालयापासून ते केंद्र सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यालयांपर्यंत हेच दृश्य दिसते. हे दृश्य एका दरबारी मनोवृत्तीचे दर्शन घडवते. तिथे जाणाऱ्या व्यक्तीस ही जाणीव करून देण्यात येत की तुम्ही नागरिक नसून कुठल्या तरी राजाची किंवा संस्थानिकाची प्रजा आहात. या परदेशी लेखकाने वास्तव एका उद्बोधक वाक्यात मांडले आहे: 'इंडियन्स आर नॉट गव्हर्न्ड, दे आर रुल्ड!' आणि हे वास्तव आपल्या अंगवळणीच पडले आहे.अलीकडेच वाचनात आले की, महाराष्ट्रात पोलीस भरतीच्या अदमासे साडेसातारा हजार जागांसाठी साडेसातारा लाखांच्या आसपास अर्ज आले होते. याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. उल्लेखनीय गोष्ट अशी की पोलीस मुख्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार यात सुमारे ४१ टक्के उमेदवार उच्च शिक्षित आहेत- डॉक्टर, अभियंते, आयआयटी, एमबीए श्रेणीतील आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वाई, कराड उत्तरेत कामाला लागा!

## अजित पवार यांच्या साताऱ्यात पदाधिकाऱ्यांना सूचना

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीत थोड्याफार दुर्लक्षामुळे झालेला दगाफटका लक्षात घेऊन यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पक्षाची बांधणी करावी. मतदारसंघनिहाय सर्व्हे केल्यानंतरच मेरिटनुसार उमेदवारीबाबत विचार केला जाईल. वाई व कराड उत्तर मतदारसंघ हा राष्ट्रवादीचा हक्काचा मतदारसंघ असून, तेथून आपलाच उमेदवार निवडून आणण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केली.**



या वेळी त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक घेऊन काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. आमदार मकरंद पाटील, दीपक चव्हाण, जिल्हा बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील, जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, कार्याध्यक्ष अमित कदम, प्रमोद शिंदे, प्रभाकर घार्गे, प्रदीप विधाते, संजीव देसाई आदी उपस्थित होते.पवार यांनी सर्वांची मते जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सूचना केल्या. पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या चुकांची दुरुस्ती यावेळेस आपल्याला विधानसभेच्या निवडणुकीत करायच्या आहेत. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघात पक्षाची बांधणी करा, महायुतीत जागा वाटपाबाबत सर्वांशी चर्चा होऊन निर्णय होणार आहे; पण आपली ताकद ज्या ठिकाणी जास्त आहे त्या जागा आपण हक्काने मागून घेऊ. साताऱ्यातील वाई कराड उत्तर हा मतदारसंघ आपल्या हक्काचा मतदारसंघ असून, तेथे आपली ताकद चांगली आहे. त्यामुळे या दोन्ही जागांवर आपलाच उमेदवार निवडून आणण्यासाठी आपण प्रयत्न करायचे आहे. या मतदारसंघात विशेष लक्ष घाला. मतदारसंघनिहाय सर्वे केल्यानंतरच मेरीटनुसान उमेदवारीबाबत विचार केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम करावे, जेणेकरून सामान्य जनतेला या योजनांचा लाभ मिळेल, असेही ते म्हणाले. बैठकीनंतर भाजपचे कराड उत्तरचे नेते, भाजपाचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांनी उपमुख्यमंत्री पवार यांची राष्ट्रवादी भवनात येऊन भेट घेतली. या वेळी त्यांची कराड उत्तर मतदारसंघाविषयी चर्चा झाली. याबाबत कदम यांना विचारले असता आमची महायुती असून, आम्ही कामानिमित्त भेटू शकतो, यात राजकारण काहीही नाही, असे स्पष्ट केले. मकरंद पाटलांविरोधात तगडा उमेदवार शरद पवार देणार आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत शशिकांत शिंदेंना वाई विधानसभा मतदारसंघातून मताधिक्य मिळाले होते. त्या पार्श्वभूमीवर विधानसभेसाठी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार मकरंद पाटील यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने उमेदवार देण्याची तयारी केली आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात शरद पवार यांच्या उपस्थितीत वाईतील कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत सविस्तर चर्चा करून विधानसभेसाठी इच्छुकांत एकमत करण्याची सूचना पवार यांनी केली.पुण्यात शरद पवारांसोबतच्या बैठकीत रणनीती ठरली आहे. वाई मतदारसंघातून डॉ. नितीन सावंत, अनिल जगताप, रमेश धायगुडे, बंडा ढमाळ, शशिकांत पिसाळ यांची पत्नी अरुणादेवी पिसाळ आदींची नावे इच्छुकांत आहेत.

या बैठकीत वाईतील आम्ही सर्व जण एकत्रित बसून एकमत घडवून आणू, असा विश्वास सर्व पदाधिकाऱ्यांनी पवार यांना दिला, तसेच सर्वांची एकजूट घडवून आमदार निवडून आणण्यास आग्रही भूमिका घेणार असल्याचा शब्द सर्वांनी शरद पवार यांना दिल्याचे दिलीप बाबर यांनी सांगितले.या वेळी त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक घेऊन काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

### पवार यांनी सर्वांची मते जाणून घेतली

आमदार मकरंद पाटील, दीपक चव्हाण, जिल्हा बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील, जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, कार्याध्यक्ष अमित कदम, प्रमोद शिंदे, प्रभाकर घार्गे, प्रदीप विधाते, संजीव देसाई आदी उपस्थित होते.पवार यांनी सर्वांची मते जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सूचना केल्या. पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या चुकांची दुरुस्ती यावेळेस आपल्याला विधानसभेच्या निवडणुकीत करायच्या आहेत.

# मनोज जरांगेंनी सामंजस्याची भूमिक घ्यावी

## जरांगे यांच्या बेमुदत उपोषणावर शंभूराज देसाईंची प्रतिक्रिया

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणीसह विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी मनोज जरांगे यांनी सरकारला १३ जुलैपर्यंतचा वेळ दिला होता. मात्र, सरकारला त्यांच्या मागण्या पूर्ण करता आलेल्या नाही. त्यामुळे मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचा पावित्रा घेतला आहे. त्यांनी आजपासून पुन्हा एकदा आंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषण सुरु केलं आहे.**



दरम्यान, त्यांच्या उपोषणावर आता राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी भाष्य केलं आहे.शंभूराज देसाई यांनी आज टीव्ही ९ वृत्तावाहिनीशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना मनोज जरांगे यांच्या उपोषणाबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, मनोज जरांगे यांनी उपोषण न करता, सामंजस्याची भूमिका घ्यावी, अशी प्रतिक्रिया शंभूराज देसाई यांनी दिली."गेल्या महिन्यात मनोज जरांगे यांनी जे उपोषण केलं. तेव्हा मी त्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली होती. तेव्हा त्यांनी तीन मागण्या मांडल्या होत्या. त्यात सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी, हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्रांचे वाटप आणि मराठा आंदोलकांवरील केस मागे घेण्याच्या मागणीचा समावेश होता. त्यांची भेट घेतल्यानंतर मी स्वतः संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. तसेच सगेसोयऱ्यांच्या ड्राफ्टबाबत माहिती घेतली.

### लाडकी बहीण योजनेवर टीका

त्याचं काम आजही सुरू आहे, हैदराबाद गॅझेटबाबत तेलंगणा सरकारकडे आम्ही कागद पत्रांची मागणी केली आहे. तसेच गुन्हे मागे घेण्याबाबतची कार्यवाही देखील सुरू आहे, त्यामुळे मनोज जरांगे यांच्या मागण्यावर सरकार काम करत आहेत", अशी प्रतिक्रिया शंभूराज देसाई यांनी दिली.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे यांना जे आश्वासन दिले आहे. ते सरकार नक्कीच पूर्ण करेन. त्या आश्वासनांपासून सरकार मागे हटलेलं नाही. त्यामुळे मनोज जरांगे यांनी थोडी सामस्याची भूमिका घ्यावी. मराठा आक्षणाचा प्रश्न आपल्याला सोडवायचा आहे.

# ‘पराभवानंतरही अहंकार कसा येतो?

## यूपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्यावरून काँग्रेसची टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**एकीकडे देशात सध्या प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर प्रकरणाची चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे यूपीएससीच्या अध्यक्षांनी तडकाफडकी राजीनामा दिला आहे. त्यानंतर आता विविध चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान, यावरून काँग्रेसने मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. देशातील संविधानिक संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न मोदी सरकारकडून सुरू असल्याचा आरोप काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे.**



मोदी सरकार आणि आरएसएस देशातील संविधानिक संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे या संस्थांची प्रतिष्ठा आणि स्वायत्तता धोक्यात आली आहे. मागच्या काही दिवसांत यूपीएससी परीक्षेतील काही घोटाळे समोर आले आहेत. हा राष्ट्रीय सुरक्षेचा विषय आहे. एकंदरितच ही प्रकरणं बघता मोदी सरकारच्या कार्मिक मंत्रालयाने त्यांची चूक स्वीकार केली पाहिजे, अशी टीका मल्लिकार्जुन खरगे यांनी केली आहे.मागील काही दिवसांत खोटी जात आणि वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्याची प्रकरणं पुढे आली आहेत. हा एकप्रकारे एससी, एसटी, ओबीसी आणि ईडब्लूएस प्रवर्गातील लाखो विद्यार्थ्यांचा विश्वासघात आहे. हे विद्यार्थी दिवस रात्र मेहनत करून परीक्षेची तयारी करत आहेत. त्यांच्या आशा आकांशावर पाणी फेरण्याचं काम मागील काही दिवसांत झालं आहे, असेही ते म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी यूपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्यावरूनही मोदी सरकारला लक्ष केलं आहे. यूपीएससीच्या अध्यक्षांनी त्यांच्या कार्यकाळ पूर्ण होण्याच्या पाच वर्षापूर्वीच त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. मात्र, त्यांच्या राजीनाम्याचा निर्णय एक महिना गुप्त का ठेवण्यात आला? मागील काही दिवसांत पुढे आलेले घोटाळे आणि यूपीएससीच्या अध्यक्षांचा तडकाफडकी राजीनामा याचा काही संबंध आहे का? असा प्रश्न मल्लिकार्जुन खरगे यांनी विचारला आहे. तसेच यासंपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीदेखील त्यांनी केली आहे.केंद्रीय गृहमंत्री, भाजपचे नेते अमित शाह यांनी विरोधी पक्षनेते, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर सडकून टीका केली आहे. नुकत्याच झालेल्या संसदेच्या अधिवेशनात विरोधी पक्षनेते पदी विराजमान झालेल्या राहुल गांधी यांनी भाषणाच्या माध्यमातून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. तेव्हा हा एक प्रकारचा अहंकार होता अशी टीका अमित शाह यांनी केली आहे. झारखंड राज्यात भाजपाची प्रदेश विस्तारित कार्यकारिणी बैठक पार पडली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांपुढे भाषण करतांना अमित शाह यांनी झारखंडचे सरकारवर टीका केलीच आणि राहुल गांधी यांना लक्ष्य केले. अमित शाह म्हणाले ” अनेकदा असं दिसून आलं आहे की लोकशाहीत निवडणूका जिंकल्यावर सत्तेत आल्यावर अहंकार येतो.सध्या अशी लोकं झारखंडमध्ये सत्तेत आहेत. पण मी पहिल्यांदा असं पाहिलं आहे की निवडणूक हरलेल्यांना पण अहंकार आलेला आहे. संसदेमध्ये तुम्ही राहूल गांधी यांना बघितलं असेल. दोन तृतीयांश बहुमत मिळाल्यावर सुद्धा एवढा अहंकार आला नसेल एवढा त्यांना आला आहे. “अमित शाह यांनी काँग्रेसवर सडकून टीका केली आहे. मोदी सरकार आणि आरएसएस देशातील संविधानिक संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे या संस्थांची प्रतिष्ठा आणि स्वायत्तता धोक्यात आली आहे. मागच्या काही दिवसांत यूपीएससी परीक्षेतील काही घोटाळे समोर आले आहेत. हा राष्ट्रीय सुरक्षेचा विषय आहे. एकंदरितच ही प्रकरणं बघता मोदी सरकारच्या कार्मिक मंत्रालयाने त्यांची चूक स्वीकार केली पाहिजे, अशी टीका मल्लिकार्जुन खरगे यांनी केली आहे.मागील काही दिवसांत खोटी जात आणि वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्याची प्रकरणं पुढे आली आहेत. हा एकप्रकारे एससी, एसटी, ओबीसी आणि ईडब्लूएस प्रवर्गातील लाखो विद्यार्थ्यांचा विश्वासघात आहे.

### शाह यांनी काँग्रेसवर टीका केली

झारखंड राज्यात भाजपाची प्रदेश विस्तारित कार्यकारिणी बैठक पार पडली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांपुढे भाषण करतांना अमित शाह यांनी झारखंडचे सरकारवर टीका केलीच आणि राहुल गांधी यांना लक्ष्य केले. अमित शाह म्हणाले ” अनेकदा असं दिसून आलं आहे की लोकशाहीत निवडणूका जिंकल्यावर सत्तेत आल्यावर अहंकार येतो.सध्या अशी लोकं झारखंडमध्ये सत्तेत आहेत. पण मी पहिल्यांदा असं पाहिलं आहे की निवडणूक हरलेल्यांना पण अहंकार आलेला आहे. संसदेमध्ये तुम्ही राहूल गांधी यांना बघितलं असेल. दोन तृतीयांश बहुमत मिळाल्यावर सुद्धा एवढा अहंकार आला नसेल एवढा त्यांना आला आहे. “अमित शाह यांनी काँग्रेसवर सडकून टीका केली आहे.


# नीट पेपरलीक प्रकरणी सीबीआयची मोठी कारवाई

## नीट पेपरलीक प्रकरणी मुख्य सुत्रधारासह तिघांना अटक

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नीट-यूजी पेपर लीक प्रकरणी केंद्रीय अन्वेषण ब्युरो अर्थात सीबीआयकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी सीबीआयने आणखी तीन जणांना अटक केली आहे. यामध्ये पेपर लीक प्रकरणातील मुख्य सुत्रधार शशीकुमार पासवानचादेखील समावेश आहे. तर इतर दोन जण एमबीबीएसचे विद्यार्थी असल्याचे सांगण्यात आलं आहे.**






द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, सीबीआयने अटक केलेले दोन्ही विद्यार्थी हे राजस्थानच्या भरतपूर वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. कुमार मंगलम बिश्नोई आणि दिपेंद्र कुमार, अशी या विद्यार्थ्यांची नावे आहेत.

यापैकी कुमार मंगलम बिश्नोई हा द्वितीय वर्षाचा विद्यार्थी आहेत, तर दिपेंद्र कुमार प्रथम वर्षाचा विद्यार्थी आहे. हे तिन्ही जण पेपर सोडवण्यासाठी ५ मे रोजी सकाळी हजारीबागेत उपस्थित होते, अशी माहिती सीबीआयकडून देण्यात आली आहे.महत्त्वाचे म्हणजे नीट पेपर फुटीप्रकरणी सीबीआयने यापूर्वी पटना एम्समधील एमबीबीएसच्या चार विद्यार्थ्यांना अटक केली होती. तसेच एनआयटी जमशेदपूर येथील एका अभियंत्याला देखील अटक करण्यात आली होती.

याशिवाय झारखंडमधील रांची येथून सुरभी कुमारी या एमबीबीएसच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनीलादेखील ताब्यात घेण्यात आलं होतं. त्यानंतर आता सीबीआयने तिघांना अटक केली आहे.

### बिहारमध्ये सहा गुन्हे दाखल

दरम्यान, या नीट परीक्षेतील गैरप्रकारांबाबत सीबीआय तपास करत असून आतापर्यंत बिहार, गुजरात, महाराष्ट्र, राजस्थानमध्ये विविध ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले असून एकट्या बिहारमध्ये सहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.नीट-यूजी पेपर लीक प्रकरणी केंद्रीय अन्वेषण ब्युरो अर्थात सीबीआयकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी सीबीआयने आणखी तीन जणांना अटक केली आहे. यामध्ये पेपर लीक प्रकरणातील मुख्य सुत्रधार शशीकुमार पासवानचादेखील समावेश आहे. तर इतर दोन जण एमबीबीएसचे विद्यार्थी असल्याचे सांगण्यात आलं आहे.

# निक ने सहा वर्षांपूर्वी प्रियांकाला घातली होती लग्नाची मागणी

बॉलीवूडचे कलाकार सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटातील भूमिकेमुळे, कधी त्यांच्या वक्तव्यामुळे तर कधी सोशल मीडियावरील पोस्टमुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. गेल्या काही दिवसांपासून बॉलीवूडची देसी गर्ल प्रियांका चोप्रा चर्चेत आहे.अमेरिकन गायक आणि प्रियांका चोप्राचा पती निक जोनासने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केल्याने हे जोडपे चर्चांचा भाग बनले आहे. निक जोनसने इन्स्टाग्राम अकाउंटवर दोघांचा एक फोटो शेअर करत म्हटले आहे की, सहा वर्षांपूर्वी एका सुंदर, विस्मयकारक स्त्रीला मी लग्नासाठी विचारले होते. मला होकार दिल्याबद्दल, धन्यवाद! निकने या दिवशी प्रियांकाला लग्नासाठी विचारले होते, त्या निमित्ताने त्याने ही पोस्ट शेअर केली आहे. त्याच्या पोस्टवर चाहत्यांनी खूप सुंदर जोडी असे म्हणत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.प्रियांकाचा पती निक जोनास हा अमेरिक गायक असून, तो अभिनय क्षेत्रातदेखील काम करताना दिसतो. डिसेंबर २०१८ ला या जोडीने लग्नगाठ बांधली. या दोघांच्या वयात १० वर्षांचे अंतर असून, प्रियांका चोप्रा निकपेक्षा वयाने मोठी असल्याने त्यांच्या लग्नासंबंधी चर्चा रंगल्या होत्या. या जोडप्याला दोन वर्षांची



मुलगी असून, तिचे नाव मालती असे आहे. प्रियांकाने नुकताच आपला ४२ वा वाढदिवस साजरा केला. त्यावेळी निक जोनासने इन्स्टाग्राम अकाउंटवर प्रियांकासोबतचे काही फोटो शेअर करीत, "तू स्त्री म्हणून जशी आहेस, त्यामुळे मी स्वत:ला भाग्यवान समजतो. वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा!" असे लिहीत त्याने प्रेमळ शुभेच्छा प्रियांका चोप्राने २००२ मध्ये तमीळ चित्रपट 'थामिझन'मधून चित्रपटसृष्टीत आणि २००३ मध्ये 'हीरो : लव्ह स्टोरी ऑफ स्पाय' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. 'फॅशन', 'बर्फी', 'बाजीराव मस्तानी', 'ऐतराज', 'सात खून माफ', 'मेरी कोम', 'द स्काय इज पिंक', 'कमीने' अशा एकापेक्षा एक चित्रपटांतील विविध भूमिकांच्या माध्यमातून तिने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. सध्या ही देसी गर्ल हॉलीवूडमध्येदेखील आपला चाहतावर्ग निर्माण करीत असल्याचे पाहायला मिळत आहे.

## सुकुमारनने केलं नेपोटीझमवर भाष्य

'नेपोटीझम' हा गेल्या काही वर्षांपासूनचा वादग्रस्त मुद्दा आहे. बॉलिवूड इंडस्ट्रीत याबाबत अनेक वादविवाद पाहायला मिळतात पण इतर सिनेइंडस्ट्रीमध्ये या गोष्टीला तितकंस महत्त्व दिलं जात नाही. बॉलिवूड इतकीच मोठी असणाऱ्या साऊथ इंडस्ट्रीमध्येही अनेक कलाकार फिल्मी कुटूंबातून आलेले आहेत. याबाबत साऊथ सुपरस्टार पृथ्वीराज सकुमारनने मॅशेबल इंडियाशी संवाद साधला आणि नेपोटीझमबाबत त्याच मत व्यक्त केलं.पृथ्वीराज त्याचा मित्र दुलकर सलमानबाबत बोलत असताना त्याने नेपोटीझमविषयी भाष्य केलं. तो म्हणाला,"मी ही नेपोकिड आहे हे मी मान्य करतो आणि हे सत्य आहे. मी फक्त आता माझ्याविषयी सांगतो. मी ही या इंडस्ट्रीत फक्त माझ्या नावामुळे आलो. मी हे स्वीकारलं आहे आहे कि, मला फक्त माझ्या नावामुळे या इंडस्ट्रीत प्रवेश मिळाला.

## करीनाचीक्रेझ आजही कायम

बॉलिवूडची ग्लॅमगर्ल बेबो म्हणजेच करीना कपूरची क्रेझ आजही कायम आहे. नुकताच तिचा क्रू हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस आला. तिचा हा सिनेमा चांगलाच गाजतोय. याचदरम्यान तिने तिच्या चाहत्यांशी संवाद साधला. यावेळी तिने दिलेल्या उत्तरांनी सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.करीनाने तिच्या चाहत्यांशी इंस्टाग्रामवरील आस्क मी नाऊ या फिचरद्वारे संवाद साधला. यावेळी तिच्या एका चाहत्याने तिला ती लहानपणी कोणतं कार्टून बघायची असा प्रश्न विचारला त्यावर करिनाने 'टॉम एन जेरी' कार्टूनचा फोटो शेअर केला आणि "टीम आणि जेह प्रमाणे मी सुद्धा टॉम एन जेरी बघायचे" असं उत्तर दिलं. एका चाहत्याने तिला तिचं आवडीचं जेवण काय आहे असं विचारलं त्यावर तिने,"खूप मोठी लिस्ट आहे जसं कि पिझ्झा, खिचडी. कढी चावल, बिर्याणी आणि बरंच काही..." असं उत्तर दिलं.तर एकाने तिला तू जेव्हा 'सोना कितना सोना है' हे गाणं गायलंस तेव्हा लोलोची (करिष्मा) रिॲक्शन कशी होती? असा प्रश्न केला त्यावर तिने,"तिला खूप आवडलं. "इतकंच नाही तर करीनाने यावेळी तिच्या आगामी प्रोजेक्टबाबतही महत्त्वाचा खुलासा केला.



## 'मेट गाला 2024' ला दीपिका राहणार गैरहजर

मॉम टू बी' दीपिका पादुकोण सध्या सतत चर्चेत आहे. तिच्या सोशल मीडिया पोस्ट, वेगवेगळ्या कार्यक्रमांना ती लावत असलेली हजेरी यावर तिचे चाहते बारीक नजर ठेवून असून सतत तिच्याविषयीचे अपडेट्स जाणून घेण्यास उत्सुक असतात. आपल्या युनिक फॅशन सेन्समुळे चर्चेत राहणाऱ्या दीपिकाच्या चाहत्यांसाठी मात्र एक निराशाजनक बातमी आहे. दीपिका यंदाच्या 'मेट गाला 2024' या कार्यक्रमाला हजेरी लावणार नाहीये. गेल्या काही वर्षांपासून दीपिका या कार्यक्रमाला सातत्याने हजेरी लावली आहे. पण यंदा तिच्या पूर्वनियोजित कामांमुळे ती यावेळी मेट गालाला उपस्थित राहू शकणार नसल्याचं म्हंटलं जातंय.सूत्रांच्या म्हणण्यानुसार, दीपिकाने आधीच तिच्या तारखा सिनेमाच्या शूटसाठी दिल्या आहेत आणि ती या काळात तिच्या आगामी सिनेमाच्या शूटिंगमध्ये बिझी असणार आहे. सूत्रांनी इंडिया डॉट कॉम या वेबसाईटला दिलेली मुलाखतीत सांगितलं कि,"दीपिका सातत्याने मेट गालाच्या रेड कार्पेटवर हजेरी लावत आलीये. त्यामुळे यावर्षीही तिचे चाहते तिला रेड कार्पेटवर पाहण्यास उत्सुक असणं स्वाभाविक आहे. ती जागतिक स्तराची ब्रँड ॲम्बेसिडर असलेल्या भारतीय अभिनेत्रींपैकी एक आहे. दीपिका सध्या सिंघम ३ या सिनेमाच्या शूटमध्ये बिझी आहे आणि हा सिनेमा या वर्षी प्रदर्शित होणार आहे. यासोबतच तिचा कल्की २८९८ एडी हा सिनेमा या मे महिन्यात रिलीज होतो आहे. त्यामुळे तिचं सगळं वेळापत्रक मेट गालाच्या तारखांशी जुळत नाहीये. त्यामुळे ती या वर्षीच्या कार्यक्रमाला हजर राहू शकत नाही ." असं स्पष्टीकरण त्यांनी यावेळी दिलं. तसेच दीपिका प्रेग्नेंट असून सप्टेंबरमध्ये तिच्या बाळाचा जन्म होणार असल्याचं म्हंटलं जातंय. त्यामुळे सध्या ती जास्तीत जास्त वेळ तिचे आगामी प्रोजेक्ट्स पूर्ण करण्यात देत आहे. सोशल मीडियावर तिने तिच्या प्रेग्नेंसीची बातमी शेअर करताच तिच्या चाहत्यांना खूप आनंद झाला होता.'मेट गाला' हा कार्यक्रम हा न्यूयॉर्कमधील कॉस्च्युम इन्स्टिट्यूटतर्फे दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केला जातो.

## रश्मिका मंदानाच्या बहिणीला व्हायचेय अभिनेत्री



दाक्षिणात्य इंडस्ट्रीबरोबरच बॉलीवूड सिनेसृष्टीतही आपल्या अभिनयानं प्रेक्षकांना भुरळ घालणारी आणि नॅशनल क्रश म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री म्हणजेच रश्मिका मंदाना. २०२३ रोजी प्रदर्शित झालेल्या 'ॲनिमल' चित्रपटामुळे ती अनेकदा चर्चेत आली. रश्मिकाला नेहमीच तिचं वैयक्तिक आयुष्य खासगी ठेवायला आवडतं. खूप कमी जणांना माहीत असेल की, रश्मिकाला एक लहान बहीण आहे आणि त्यांच्यात १६ वर्षांचं अंतर आहे. रश्मिकाची बहीण आता १० वर्षांची आहे.'नो फिल्टर नेहा' या नेहा धुपियाच्या शोला दिलेल्या मुलाखतीत रश्मिकानं तिच्या आणि बहिणीच्या नात्याबद्दल सांगितलं. रश्मिका म्हणाली, "तिला चित्रपट खूप आवडतात.जेव्हा मी चित्रपटांमध्ये रडते तेव्हा मला बघून ती तीन-चार तास रडते. तिला असं वाटतं की, माझी बहीण रडतेय, तिला त्रास होतोय. जर चित्रपटात मला कोणी ओरडलं, तर तिला ती व्यक्ती खऱ्या आयुष्यात आवडत नाही. ती त्याचा तिरस्कार करते. तिला असं वाटतं की, ही व्यक्ती माझ्या बहिणीला कशी काय त्रास देऊ शकते."ती नेहमी म्हणत असते की, मला अभिनेत्री व्हायचंय. जेव्हा मी घरी जाते आणि कोणी घरी आलं आणि माझ्याबरोबर सेल्फी काढला, तर तीही त्या सेल्फीमध्ये येते आणि मस्त स्माइल वगैरे करते. मला ते सगळं क्यूट वाटतं. पण तिला हे माहीत नाही की, मी कधी उठते, मी किती व्यायाम करते, मी स्किन क्लिनिकला जाते तेव्हा मी काय करते. हे सगळं तिला अजून माहीत नाही. ती मला एक बहीण म्हणून पूर्णपणे ओळखते. तर हे सगळं पुढे जाऊन नक्की कसं असेल हे तिला अजून माहीत नाही. ती माझ्या लहान मुलीसारखीच आहे," असं रश्मिका म्हणाली.

# नॅशनल क्रशने जिंकली मनं!

## » स्मृती मानधनाने खास चाहतीला फोन गिफ्ट केला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**महिला आशिया चषक २०२४ चा दुसरा सामना भारत आणि पाकिस्तान यांच्यात श्रीलंकेतील रंगिरी डंबुला आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात भारतीय महिला संघाने पाकिस्तानचा ७ गडी राखून पराभव केला आहे. या सामन्यात टीम इंडियाचे फलंदाज आणि गोलंदाज दोघांनीही चमकदार कामगिरी केली. भारताकडून या सामन्यात स्मृती मानधनाने सर्वाधिक ४५ धावांचे योगदान दिले. सामन्यानंतर स्मृतीचा श्रीलंकन चाहतीबरोबरचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत, ज्यामध्ये तिने चांहत्यांची मनं जिंकली.**




पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यानंतर स्मृती मानधनाने आपल्या एका खास दिव्यांग चाहतीची भेट घेतली. व्हिलचेअरवरुन भेटायला आलेल्या आदिशा हेराथचे क्रिकेटवरील प्रेम तिला सर्व आव्हानांना न जुमानता स्टेडियमपर्यंत घेऊन आले. त्यामुळे आज दिवस तिच्यासाठी खूप खास होता. कारण तिची आवडती क्रिकेटर स्मृती मानधना हिला भेटण्याची संधी मिळाली, जिने तिला कृतज्ञता म्हणून मोबाईल फोन गिफ्ट दिला. त्याचबरोबर तिच्याशी आपुलकीने संवाद साधला. त्याचबरोबर मैदानावर तिच्याबरोबर काही फोटोही काढले. या खास क्षणाचा व्हिडीओ श्रीलंका क्रिकेट बोर्डाने एक्सवर शेअर केला आहे.श्रीलंका क्रिकेट बोर्डाने एक्सवर शेअर केलेल्या व्हिडीओ आता व्हायरल होत असून चाहते स्मृतीचे कौतुक करत आहेत. या व्हिडीओवर चाहते कमेंट करुन मोठ्या आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. सामन्यातील स्मृतीच्या कामगिरीबद्दल बोलायचे तर तिन पहिल्या विकेट्साठी शफाली वर्मासह ८५ धावांची भागीदारी केली. यानंतर स्मृतीने अवघ्या पाच धावांनी अर्धशतक हुकले. तिने ३१ चेंडूंचा सामना करताना ९ चौकारांच्या मदतीने ४५ धावांची खेळी साकारली.टीम इंडियाने पाकिस्तानला १०८ धावांवर ऑलआउट केले. निदा दारच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान संघाकडून अमीनने सर्वाधिक २५ धावा केल्या. तिने ३५ चेंडूंचा सामना करत ३ चौकार मारत २२ धावांची खेळी केली. फातिमा सनाने १६ चेंडूंचा सामना करताना त्याने नाबाद २२ धावा केल्या. सनाने एक चौकार आणि दोन षटकार मारले. हसनने १९ चेंडूंचा सामना करत २२ धावा केल्या. तिने ३ चौकार मारले. भारतीय गोलंदाजांची या सामन्यात चमकदार कामगिरी पाहायला मिळाली. दीप्ती शर्माने ४ षटकात २० धावा देत ३ विकेट्स घेतल्या. दीप्तीने ८ धावांच्या वैयक्तिक धावसंख्येवर पाकिस्तानचा कर्णधार निदाची विकेट घेतली. त्याचबरोबर हसन २२ धावांच्या वैयक्तिक धावांवर बाद केले. तसेच रेणुका सिंग, श्रेयंका पाटील आणि पूजा यांनी २-२ विकेट्स घेतल्या. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यानंतर स्मृती मानधनाने आपल्या एका खास दिव्यांग चाहतीची भेट घेतली. व्हिलचेअरवरुन भेटायला आलेल्या आदिशा हेराथचे क्रिकेटवरील प्रेम तिला सर्व आव्हानांना न जुमानता स्टेडियमपर्यंत घेऊन आले. त्यामुळे आज दिवस तिच्यासाठी खूप खास होता. कारण तिची आवडती क्रिकेटर स्मृती मानधना हिला भेटण्याची संधी मिळाली, जिने तिला कृतज्ञता म्हणून मोबाईल फोन गिफ्ट दिला. त्याचबरोबर तिच्याशी आपुलकीने संवाद साधला. त्याचबरोबर मैदानावर तिच्याबरोबर काही फोटोही काढले.

### चाहत्यांकडून कौतुकाचा वर्षाव

या खास क्षणाचा व्हिडीओ श्रीलंका क्रिकेट बोर्डाने एक्सवर शेअर केला आहे.श्रीलंका क्रिकेट बोर्डाने एक्सवर शेअर केलेल्या व्हिडीओ आता व्हायरल होत असून चाहते स्मृतीचे कौतुक करत आहेत. या व्हिडीओवर चाहते कमेंट करुन मोठ्या आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. सामन्यातील स्मृतीच्या कामगिरीबद्दल बोलायचे तर तिन पहिल्या विकेट्साठी शफाली वर्मासह ८५ धावांची भागीदारी केली. यानंतर स्मृतीने अवघ्या पाच धावांनी अर्धशतक हुकले. तिने ३१ चेंडूचा सामना करताना ९ चौकारांच्या मदतीने ४५ धावांची खेळी साकारली.टीम इंडियाने पाकिस्तानला १०८ धावांवर ऑलआउट केले. निदा दारच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान संघाकडून अमीनने सर्वाधिक २५ धावा केल्या. तिने ३५ चेंडूंचा सामना करत ३ चौकार मारत २२ धावांची खेळी केली.

# 'भावा, घरी बायका मुलं आहेत जरा बेताने

## » वेस्ट इंडिज आता इंग्लंडपेक्षा फक्त 65 धावांनी पिछाडीवर

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मार्क वुडने शुक्रवारी ट्रेंट ब्रिज येथे वेस्ट इंडिजविरुद्ध्या दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान मायदेशात इंग्लंडच्या गोलंदाजाने सर्वात वेगवान कसोटी षटक टाकून इतिहास रचला. मात्र, असे असतानाही केव्हम हॉज आणि ॲलेक अथानाजे यांनी चौथ्या विकेटसाठी केलेल्या १७५ धावांच्या भक्कम भागीदारीच्या जोरावर दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा वेस्ट इंडिजने पाच गडी गमावून ३५१ धावा केल्या. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर केव्हिन हॉजने मार्क वूडच्या वेगवान माऱ्याचा सामना करताना त्याच्याशी केलेल्या मस्करीचा किस्सा सांगितला.**




दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात वेस्ट इंडिज आता इंग्लंडपेक्षा फक्त ६५ धावांनी पिछाडीवर आहे. तत्पूर्वी, इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ४१६ धावा केल्या होत्या. केव्हम हॉजने १७१ चेंडूंचा सामना करताना १९ चौकारांच्या मदतीने १२० धावा केल्या. अलिकने ९९ चेंडूंचा सामना करत १० चौकार आणि एक षटकार मारत ८२ धावांचे योगदान दिले.नुकताच निवृत्त झालेला वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनच्या जागी इंग्लंडच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये मार्क वूड सामील झाला आहे. ज्याने आपल्या पहिल्याच षटकातील वेगवान माऱ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याने पहिलाच चेंडू ताशी १५१.१ किमी वेगाने टाकला. यानंतर दुसरा चेंडू १५४.६५, तिसरा १५२.८८, चौथा १४८.०६ , पाचवा ताशी १५५.३० वेगाने आणि शेवटचा चेंडू वेस्ट इंडिजचा कर्णधार क्रेग ब्रॅथवेटला ताशी १५३.२० किमी वेगाने टाकण्यात. अशा प्रकारे मार्क वूडने ताशी १५१.९२ किमी वेगाने षटक टाकले, ज्यामुळे सर्वजण चकीत झाले. यावर आता केव्हिन हॉजने प्रतिक्रिया दिली आहे.दुसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर केव्हिन हॉज मार्क वूडशी केलेल्या मस्करीबद्दल म्हणाला

### हॉजने झळकावले दमदार शतक

"आजचा दिवस खूप क्रूर होता. तुम्ही प्रत्येक दिवशी कमाल करु शकत नाही. विशेषता मार्क वूडसारख्या वेगवान गोलंदाजा सामना करताना. कारण तो प्रत्येक चेंडू ताशी ९० किमी वेगाने टाकत होता. एक वेळ अशी आली, जेव्हा मी त्याच्याशी मस्करी करताना म्हणालो, अरे भावा, जरा बेताने घरी बायका मुलं आहेत. पण शतकानंतर मी सुटकेचा निश्वास सोडला. कसोटी क्रिकेट क्रूर आहे, कारण ते मानसिकदृष्ट्या थकवणारे आहे. ज्यामध्ये मार्क वुड सारख्या गोलंदाजांचा सामना करणे कठीण होते, परंतु ते समाधानकारक होते."मार्क वुड्च्या वेगवान चेंडूंचा कॅरेबियन खेळाडूंवर फारसा प्रभाव पडला नाही. फिरकीपटू शोएब बशीरने इंग्लिश संघाला यश मिळवून दिले. सलामीवीर मायकेल लुईसशिवाय त्याने कर्क मॅकेन्झीलाही आपला शिकार बनवले. इंग्लिश संघाकडून ॲटकिन्सन, ख्रिस वोक्स आणि कर्णधार बेन स्टोक्स यांनी प्रत्येकी एक विकेट्स घेतली. तर, वेस्ट इंडिजकडून हॉजने शतक आणि अलिक अथनाजेने अर्धशतक झळकावले.